


'इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाउंटंट्स ऑफ इंडिया'च्या मार्गदर्शन वर्गाची सुरवात नुकतीच झाली. शिवशंकर मिश्रा यांच्या हस्ते या वर्गाचे उद्‌घाटन झाले. या वेळी राजेश शुक्ला, एम. आर. पंडित, ए. आर. जोशी, रामानंद मोदाणी आदी उपस्थित होते.

# 'आयसीडब्ल्यूए'च्या मार्गदर्शन वर्गाचे उद्‌घाटन

■ 'इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाउंटंट्स ऑफ इंडिया'च्या (आयसीडब्ल्यूए) औरंगाबाद शाखेतर्फे 'इंटरमिजिएट'च्या मार्गदर्शन वर्गाची नुकतीच सुरवात झाली. सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवशंकर मिश्रा यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष रामानंद मोदाणी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ए. आर. जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. एस. बी. खडके यांनी विविध योजनांची माहिती दिली. राजेश शुक्ला यांनी आभार मानले. कार्यक्रमाला एम. आर. पंडित, एस. आर. पिंपळे, एन. आर. शर्मा, एस. व्ही. कुलकर्णी, ए. सी. पाटील आदींची उपस्थिती होती.

# 'आयसीडब्ल्यूए'च्या कार्यालयाचे उद्‍घाटन

औरंगाबाद, ता. ५ : 'द इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंटंटस् ऑफ इंडिया'च्या (आयसीडब्ल्यूए) येथील शाखेच्या नवीन इमारतीतील कार्यालयाचे उद्‍घाटन 'आयसीडब्ल्यूए'चे अध्यक्ष बी. व्ही. रामनमूर्ती यांच्या हस्ते सोमवारी (ता. दोन) त्रिमूर्ती चौकातील चेतन सुपर मार्केट येथे झाले. या वेळी येथील शाखेचे अध्यक्ष आर. जी. मोदाणी, वरिष्ठ सदस्य ए. आर. जोशी, सदस्य एम. आर. पंडित, एस. बी. खडके आदींची उपस्थिती होती. येथील शाखेच्या अभ्यासक्रमाविषयी बोलताना श्री. मोदाणी म्हणाले, की येत्या ता. १५ जूनपासून 'आयसीडब्ल्यूए'चे वर्ग सुरू होणार आहेत. बारावी व कुठल्याही शाखेच्या पदवीच्या विद्यार्थ्यांनी या वर्गांचा लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी २३२१८२८ येथे संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. मोदाणी यांनी केले.

# दीड लाख युवकांचे भवितव्य घडविण्याचा प्रयत्न -मूर्ती

**औरंगाबाद, दि.३ (लोकमत ब्युरो)-** आय.सी.डब्ल्यू.ए.आय. ने देशातील दीड लाख युवकांना पात्र कॉस्ट अकाऊंटंट बनवून त्यांचे भवितव्य घडविण्याचा प्रयत्न चालविला आहे, अशी माहिती इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंटंट्स् ऑफ इंडियाचे (आय.सी.डब्ल्यू.ए.आय.) अध्यक्ष बी. रामनमूर्ती यांनी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना रामनमूर्ती यांनी आय.सी.डब्ल्यू.ए.आय. च्या कामांची माहिती दिली. ते म्हणाले की, आय.सी.डब्ल्यू.ए.आय. चे देशात ३० हजार पात्र कॉस्ट अकाऊंटंटस् आहेत. दीड लाख विद्यार्थी परीक्षेची तयारी करीत आहेत. आपले सदस्य आणि विद्यार्थ्यांना नित्यनूतन ज्ञान देणे, कायद्यातील दुरुस्त्या त्यांना सांगणे, सदस्यांमध्ये समन्वय राखणे याला आम्ही प्राधान्य देतो.

आय.सी.डब्ल्यू.ए.आय. च्या जबाबदाऱ्यांविषयी माहिती देताना ते म्हणाले की, जागतिकीकरणानंतर कोणतेही उत्पादन अथवा सेवेचे मूल्य निश्चित करण्याचे काम [illegible]ठे नाजूक झाले आहे. आय.सी.डब्ल्यू.ए.आय. ला एकीकडे उत्पादन खर्च आणि नफ्याचा विचार करावा लागतो, तर दुसरीकडे ग्राहकांच्या क्रयक्षमतेचाही विचार करावा लागतो. किमतीत स्पर्धात्मकतेचा विचार करणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेत आय.सी.डब्ल्यू.ए.आय. ची भूमिका महत्त्वाची झाली आहे. आय.सी.डब्ल्यू.ए.आय. च्या सदस्यांचा सरकारी आणि खाजगी कंपन्यांमधील व्यवस्थापकीय संचालक, अध्यक्ष, वित्त व्यवस्थापक आणि संचालक यांच्याशी खूपच जवळून संबंध येतो. हे सदस्य आपली ही माहिती आपल्या सहकाऱ्यांना देतात. त्यामुळे व्यवस्थापकीय कामकाजाची माहिती राहते. ते म्हणाले की, कंपन्यांचे वार्षिक ऑडिट सुलभ बनविण्याची आय.सी.डब्ल्यू.ए.आय. ने केंद्र सरकारकडे मागणी केली आहे. यावेळी स्थानिक शाखेचे अध्यक्ष रामानंद मोदानी, ए.आर. जोशी, एम.आर. पंडित, आर.बी. शुक्ला, आर.पी. गोरे यांच्यासह अनेक विद्यार्थी हजर होते.